**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती विशेष सभा क्रमांक : ०४**
**(ऑनलाईन झुम अॅप द्वारे)**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २५/०६/२०२१

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३(क) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा क्रमांक ०४ शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता मा.उपसचिव , महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०६ मे २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम अॅप द्वारे आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत.

तरी सदर सभेत आपण ऑनलाईन सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

प्र.नगरसचिव
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक २५/०६/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४९ | अहमदनगर महानगरपालिकेकरीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी करणेबाबत फेर ई- निविदा Tender ID:२०२१_ANMC_ ६९११११२_१ अन्वये मागविण्यात आलेल्या Expression fo Interest मधील प्राप्त निविदाकारांचा दराबाबतचा तुलनात्मक तक्ता ऑफिस रिपोर्ट. |

**टिप-** १] प्रत्येक सदस्यांने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरून Zoom App डाउनलोड करून घ्यावे.
२] Zoom App द्वारे प्रत्येक सदस्यांना मा.स्थायी समिती सभेस उपस्थित राहता येईल.
३] मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकासविभाग यांचेकडील दि.०३जुलै२०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ९ सप्टेंबर २०२० व दिनांक ०६ मे २०२१ च्या पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन झुम अॅप द्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत :- विषय क्रमांक- ४९ प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०४**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- ४९ शुक्रवार दि. २५/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेकरीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी करणेबाबत फेर ई- निविदा Tender ID:२०२१_ANMC_ ६९११११२_१ अन्वये मागविण्यात आलेल्या Expression of Interest मधील प्राप्त निविदाकारांचा दराबाबतचा तुलनात्मक तक्ता ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की,अहमदनगर महानरपालिके करीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅट १२५ ऑक्सीजन सिलेंडर प्रति दिन बाबतचा प्रकल्प खाजगी एजन्सी मार्फत विकसीत करणे करीता एकुण ४ निविदाधारकांचे प्रस्ताव प्राप्त झाले.सदरच्या प्राप्त प्रस्तावामधील तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता एकुण २ निविदाधारक पात्र झाले व त्यानुसार त्यांचे व्यापारी लिफाफ्यामधील दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | Expression of Interest मध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १ | Maven Corporation Nashik | रू.१,९१,००,०००/- |
| २ | Landsky Engineers Pvt Ltd,Pune | रू.१,४०,२५,०००/- |

वरील दोन निविदाधारकांनी निविदेमध्ये नमुद दराची तुलना करता Landsky Engineers Pvt Ltd,Pune यांचे नमुद दर रक्कम रू.१,४०,२५,०००/- तुलनेने कमी असल्याने सदर एजन्सीस दिनांक २२/०६/२०२१ रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.त्यानुसार सदर वाटाघाटीमध्ये Expression of Interest मध्ये नमुद केलेले दर हे सर्व करासहित असल्याने दर कमी करण्यास नकार दिला परंतु सदर ठिकाणी ऑक्सीजन जनरेशन प्लॅट उभारणी करीता आवश्यक असलेल्या स्थापत्य कामापैकी २५ फुट x २५ फुट व १मिटर उंचीचे प्लिंथ लेव्हल पर्यतचा ओटा स्वखर्चाने करणे बाबत सहमती दर्शविली आहे.तरी Landsky Engineers Pvt Ltd,Pune एजन्सीने वाटाघाटी अंती नमुद केलेले दर वाजवी असल्याचे दिसुन येते त्यानुसार ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी १२५ सिलेंडर क्षमतेचा PSA तत्रज्ञान असलेला ऑक्सीजन निर्मिती प्रकल्प विकसित करणे बाबत मागविण्यात आलेल्या Expression of Interest मधील प्राप्त दराचा तुलनात्मक तक्ता निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडेस सादर करणेस मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता,प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उप अभियंता प्रकल्प विभाग यांचे प्रस्तावानुसार अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडे सादर करण्यास मंजुरी मिळणेबाबत.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी करणेबाबत फेर ई- निविदा Tender ID:२०२१_ANMC_ ६९११११२_१ अन्वये मागविण्यात आलेल्या Expression of erest मधील प्राप्त निविदाकारांच्या तुलनात्मक तक्या बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- कोरोनच्या दुस-या लाटेमध्ये मोठया प्रमाणात प्रर्दुभाव झाल्याने शहरामधील हॉस्पीटल मध्ये ऑक्सीजनचा तुटवडा झाला होता.संभाव्य तीस-या लाटेची शक्यता असल्याने हा चांगला विषय आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑक्सीजन निर्मीती प्रकल्पा बाबत सविस्तर माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.आर.जी.मेहेत्रे :- ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी १२५ सिलेंडर क्षमतेचा आहे.या कामाकरीता दोन निविदा प्राप्त झाल्या असून लघुत्तम निविदा धारक Landsky Engineers Pvt Ltd,Pune एजन्सी फायनल केली आहे. ऑक्सीजन जनरेशन प्लॅट उभारणी करीता आवश्यक असलेल्या स्थापत्य कामापैकी २५ फुट x २५ फुट व १मिटर उंचीचे प्लिंथ लेव्हल पर्यतचा ओटा स्वखर्चाने करणे बाबत सहमती दर्शविली आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑक्सीजन प्लॅटची उभारणी झाल्यानंतर तो कार्यान्वीत होण्याकरीता आपण काय उपाययोजना केल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- ऑक्सीजन प्लॅटची उभारणी झाल्यानंतर तो कार्यान्वीत होण्याकरीता,प्रकल्प अधिकारी श्री.मेहेत्रे यांच्या चर्चा झाली असून सदर प्रकल्प कार्यान्वीत करणे,देखभाल दुरूस्ती करणे या करीता लगेचच निविदा प्रसिध्द करण्याबाबत सुचना केल्या आहे.सदर प्रकल्प चालविण्यास देण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- सदर प्रकल्प किती दिवसांमध्ये पुर्ण होणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.आर.जी.मेहेत्रे :- ४५ दिवसांमध्ये प्रकल्प पुर्ण होणार आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- मा.सभापती साहेब,४५ दिवसांऐवजी ४० दिवसांमध्ये प्रकल्प पुर्ण करण्याच्या सुचना दया. किंवा ४५ दिवसांमध्ये प्रकल्प पुर्ण न झाल्यास प्रत्येक दिवशी दंड आकारण्या यावा.

डॉ.श्री.सागर बोरूडे :- प्रकल्प उभारणी च्या ४५ दिवसांची रोजच्या रोज माहिती मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात यावी.म्हणजे आपले त्यावर नियंत्रण राहील व प्रकल्प लवकर कार्यान्वीत होईल.

मा.सभापती साहेब :- ४५ दिवसांचा बार चार्ट तयार करून मा.स्थायी समितीकडे सादर करावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- या प्रकल्पाचे देयके कशा प्रकारे अदा करणार आहे.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.आर.जी.मेहेत्रे :- सर्व साहित्य आल्यानंतर ५०% प्रकल्प उभारल्यानंतर ४०% व कार्यान्वीत झाल्यानंतर १०% या प्रकारे देयके अदा करण्यात येणार आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेकरीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी करणेबाबत फेर ई- निविदा Tender ID:२०२१_ANMC_ ६९१११२_१ अन्वये मागविण्यात आलेल्या Expression of Interest मधील Landsky Engineers Pvt Ltd,Pune एजन्सीने वाटाघाटी अंती नमुद केलेल्या वाजवी दरानुसार ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी १२५ सिलेंडर क्षमतेचा PSA तंत्रज्ञान असलेला ऑक्सीजन निर्मिती प्रकल्प विकसित करणे बाबतच्या Expression of Interest मधील प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे.सदरचा प्रकल्प उभारणी झाल्यानंतर तो चालविण्यास व देखभाल दुरूस्ती करीती खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करीता निविदा तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेकरीता ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी करणेबाबत फेर ई- निविदा Tender ID:२०२१_ANMC_ ६९१११२_१ अन्वये ऑक्सीजन जनरेशन प्लॅटची उभारणी सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी १२५ सिलेंडर क्षमतेचा PSA तंत्रज्ञान असलेला ऑक्सीजन निर्मिती प्रकल्प विकसित क रणे बाबतच्या Expression of Interest मधील Landsky Engineers Pvt Ltd,Pune यांच्या रक्कम रू.१,४०,२५,०००/- या वाटाघाटी अंती नमुद केलेल्या वाजवी दरास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. सदरचा प्रकल्प उभारणी झाल्यानंतर तो चालविण्यास व देखभाल दुरूस्ती करीती खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करीता निविदा तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- डॉ.मा.श्री.सागर बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका